1/5

**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary. stateboard@gmail.com

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : 25651750

क्र.रा.म./परीक्षा-३/3623
पुणे - ४११००४
दि.-१७/०७/२०१९
18

**प्रति,**

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषयः-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी-मार्च २०२० च्या परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी अर्जाबाबत.

उपरोक्त विषयाचे संदर्भात आपणास कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी अर्जाबाबत कार्यवाही दिनांक २९/०७/२०१९ पासून सुरू करण्यात येत असून सदरील अर्ज मंडळाच्या संकेतस्थळावरून भरावयाचे आहेत. त्यासंदर्भातील संक्षिप्त सूचना या पत्रासोबत जोडण्यात आलेल्या असून सदरील सूचना आपल्या स्तरावरून संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळास सादर करण्यात यावा.

तसेच इ.१०वी परीक्षेसाठी निश्चित केलेल्या संपर्क केंद्र प्रमुखांची व इयत्ता १२वी परीक्षेसाठी सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची तालुका निहाय सभा दि. २२ ते २६ जुलै २०१९ या काळात घेऊन सदर सभेसाठी आपल्या विभागीय मंडळाने निश्चित केलेला कार्यक्रम राज्यमंडळास तातडीने सादर करावा.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे- ०४

D:\Bamane\letter.docx215

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
## खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी विभागीय मंडळांना सूचना

१. इयत्ता १०वी मार्च २०२० परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरीता माध्यम निहाय संपर्क केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या केंद्रांच्या केंद्र प्रमुखांची सभा दिनांक २२ ते २६जुलै २०१९ या काळात घेण्यात येऊन त्याना सूचना द्याव्यात.

२. इ.१२वी फेब्रुवारी–मार्च २०२० परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरीता सर्व कनिष्ठ महाविद्यालय नाव नोंदणी व त्याच कनिष्ठ महाविद्यालयातून परीक्षा देण्याकरिता उपलब्ध आहेत. नाव नोंदणी प्रक्रियेबाबत परिपत्रक प्रकटन काढून त्याबाबतची माहिती संबंधितांना देण्यात यावी.

३. इ.१०वी व इ.१२वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशील |
|---|---|---|
| १ | सोमवार दिनांक २९/०७/२०१९ ते शनिवार दिनांक २४/०८/२०१९ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरणे. |
| २ | मंगळवार दिनांक ३०/०७/२०१९ ते सोमवार दिनांक २६/०८/२०१९ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे. |
| ३ | शुक्रवार दिनांक ३०/०८/२०१९ | संपर्क केंद्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

४. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी व इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

५. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ** **इ.१० वी – http://form17.mh-ssc.ac.in**

**इ.१२ वी – http://form17.mh-hsc.ac.in**

६. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतःजवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.

७. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

८. संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

९. विद्यार्थ्यांनी अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

१०. खाजगी विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे-

इ.१०वी - रू.१०००/- नोंदणी शुल्क + रू. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)

इ.१२वी - रू. ५००/- नोंदणी शुल्क + रू. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)

११. विद्यार्थ्यांनी संपर्क शाळेत/क.महाविद्यालयात अर्ज व शुल्क जमा केल्यानंतर संबंधित संपर्क केंद्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सर्व अर्ज एकत्रित करून पुढील नमून्यातील यादी, मूळ अर्जासोबतची कागदपत्रे व शुल्क संबंधित विभागीय मंडळात जमा करून त्याबाबतची पोहोच घ्यावी. कोणताही विद्यार्थी या सुविधेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | अर्ज क्रमांक | विद्यार्थ्यांचे सपूर्ण नाव | शुल्क (रूपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१२. खाजगी क्लासेसकडून जर विद्यार्थ्यांचे फॉर्म नं.१७ बंचमध्ये येत असतील तर त्याची नोंद स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी व त्याची चौकशी करण्यात यावी.

१३. सदरील काम करणाऱ्या शाळा/क.महाविद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य/जेष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात यावे.

**अ) मुख्याध्यापक /प्राचार्य तथा जेष्ठ शिक्षक- (इ.१२ वी)**

१) १० विद्यार्थ्यांपर्यंत रू.१५०/-

२) १० पेक्षा जास्त विद्यार्थी रू.१५०+१०/- प्रति विद्यार्थी

३) जास्तीत जास्त रू.५००/-

**ब) लिपिक-**

१) १० विद्यार्थ्यांपर्यंत रू.१००/-

२) १० पेक्षा जास्त विद्यार्थी रू.१००+१०/- प्रति विद्यार्थी

३) जास्तीत जास्त रू.२००/-

**ब) संपर्क केंद्रासाठी देण्यात येणारे मानधन- संपूर्ण वर्षासाठी (प्रत्येक २५ विद्यार्थ्यांच्या गटासाठी) (इ.१० वी)**

| पदनाम | पदसंख्या | मानधन |
|---|---|---|
| १) केंद्रसंचालक | ०१ | ४१५/- |
| २) उपकेंद्रसंचालक | ०१ | ३३०/- |
| ३) लिपिक | ०१ | २०५/- |
| ४) शिपाई | ०१ | ८०/- |

१४. अ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केंद्राची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या संपर्क केंद्राने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन करावयाचे आहे.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्याचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळांनी मार्गदर्शन करावे.

१५. इ.१२ वी साठी विद्यार्थ्यांनी जे कनिष्ठ महाविद्यालय निश्चित केले असेल त्या क.महाविद्यालयांनी उपरोक्त १४(ब)मधील सर्व कामे करणे अनिवार्य असेल.

१६. विभागीय मंडळामध्ये अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रचलित पध्दतीने अर्जाची छाननी करावयाची आहे. अर्जाची छाननी झाल्यानंतर सदर अर्जावर पात्र/अपात्र शेरा दिल्यानंतर संबंधित लिपिक, शाखाप्रमुख, शाखाधिकारी. सहा.सचिव/सहसचिव व विभागीय सचिव यांच्या स्वाक्षऱ्या असणे अनिवार्य आहे. पात्र विद्यार्थ्यांचे नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे.

१७. आपल्या विभागीय मंडळामध्ये खाजगी विद्यार्थी संदर्भात स्वतंत्र शाखा असल्यास त्या संबंधित शाखेस स्वतंत्रपणे संगणक व नेट यंत्रणा उपलब्ध करुन देण्यात यावी.

१८. एखादा अर्ज कागदपत्रांअभावी अपात्र ठरल्यास त्या विद्यार्थ्याकडून संबंधित कागदपत्रांची पूर्तता करून घेवून अंतिम कार्यवाही करावी. अपात्र विद्यार्थ्यास प्रक्रिया शुल्काचे रू.१००/- वगळून उर्वरित रक्कम परत करण्यात यावी.

१९. सदर प्रक्रिया ऑनलाईन असल्याने यासंदर्भातील विभागीय मंडळ स्तरावरील सर्व कामकाज विभागीय मंडळातील गणकयंत्र विभाग व खाजगी विद्यार्थी शाखा यांचेकडून समन्वयाने करून घेण्यात यावे.

२०. नावनोंदणी प्रमाणपत्रासाठी पात्र केलेल्या विद्यार्थ्यांची यादीची सॉफ्टकॉपी दरवर्षी ऑनलाईन विभागाकडे पाठविली जाते त्याचप्रमाणे सदर यादीची हार्डकॉपी देखील (Excel Copy) ऑनलाईन विभागाला पाठविण्यात यावी.

२१. मार्च २०१८ प्रमाणेच जुलै–ऑगस्ट २०१८ मध्ये इ.१०वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी फेब्रुवारी– मार्च २०२० च्या इ.१२वी परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्यास सदरचे विद्यार्थी पात्र ठरतील.

२२. शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राहय धरण्यात यावा.

२३. पात्र/अपात्र विद्यार्थी निश्चित झाल्यानंतर नाव नोंदणी प्रमाणपत्र (E.C.) ऑनलाईन तयार होणार असल्याने याबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या सूचना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

२४. जे विद्यार्थी नावनोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरतील त्यांना कधी नावनोंदणी प्रमाणपत्र मिळतील याची माहिती विभागीय सचिवांना त्यांच्या मोबाईलवर ई.मेल व्दारे कळविण्यात येईल व त्यासाठी एक ओटीपी क्रमांक देण्यात येईल व सदरचा ओटीपी क्रमांक फक्त ६० मिनीटे कार्यरत राहील व याची माहिती मेसेज व्दारे संबंधित शाखेतील शाखाधिकारी, शाखाप्रमुख व लिपिक यांना कळविली जाईल.

५/५

२५. वरीलप्रमाणे मुद्दा क्र.२४ नुसार कार्यवाही करणेसाठी विभागीय मंडळाचे विभागीय सचिव, खाजगी विद्यार्थी शाखेचे संबंधित शाखाधिकारी, शाखाप्रमुख व लिपिक यांचे मोबाईल नंबर ऑनलाईन विभागास कळविण्यात यावेत.

२६. विहित शुल्क रोखीने शाळा/क.महाविद्यालयात जमा करावयाचे आहे. शाळा/क.महाविद्यालयांनी अर्जासोबत दिलेल्या पावत्यांपैकी विद्यार्थ्यांसाठीच्या प्रतीवर स्वाक्षरी व शिक्का देवून ती विद्यार्थ्याकडे द्यावी. पावतीची दुसरी प्रत अर्जासोबत जोडून विभागीय मंडळाकडे पाठवावयाची आहे. पावतीची तिसरी प्रत शाळा/क.महाविद्यालयाने स्वतःकडे संग्रहीत ठेवावयची आहे.

२७. विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत छाननीसाठी प्राप्त झालेली मूळ कागदपत्रे अर्जाची छाननी झाल्यानंतर संपर्क केंद्र शाळा/क.महाविद्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना परत करण्यात यावीत. सदर कागदपत्रे त्यांचेमार्फत विद्यार्थ्यांना परत मिळाल्याची खातरजमा करावी.

२८. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

२९. ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्र.०२०-२५७०५२०८/२५७०५२०७/२५७०५२७१ वर संपर्क साधावा.

३०. पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना संपर्क केंद्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत करून द्यावी.

३१. विभागीय मंडळांनी संपर्क केंद्रांना त्यांच्या शिबिराच्या कालावधीत भेटी देवून कामकाजाचा आढावा घेऊन विहित पध्दतीने काम होत आहे का? याची पाहणी करावी.

३२. ज्या कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्याला कला, शास्त्र व वाणिज्य शाखेत प्रवेश घ्यायचा असेल त्या कनिष्ठ महाविद्यालयास सदरच्या शाखेस मंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे.

३३. ज्या कनिष्ठ महाविद्यालयामधून विद्यार्थी परीक्षेचा फॉर्म भरणार आहे त्याच कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत फॉर्म संदर्भातील अनुषंगिक कागदपत्रे जमा करण्याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळामार्फत सूचना देण्यात याव्यात.

३४. परराज्यातील विद्यार्थ्यांनी फॉर्म नं.१७ भरला असेल तर, ज्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत संबंधित विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे त्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) अर्ज विभागीय मंडळाकडे येणे आवश्यक आहे.

सचिव

राज्यमंडळ, पुणे ०४

दिनांक १७/०७/२०१९